स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

डॉ. प्रभाकर देसाई
एम्.ए., पीएच् डी.
संचालक

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## राष्ट्रीय सेवा योजना
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७

कार्यालय क्र. : ०२०–२५६२२६८८/८९
: ०२०–२५६२२६९०/९१
: ०२०–२५६२२६९२
: ०२०–२५६९७३४१

रासेयो/२०२२–२३/९०५ दि. ०६/०१/२०२३

**प्रति,**
**मा. प्राचार्य/संचालक**
**रासेयो संलग्नित महाविद्यालये व परिसंस्था,**
**पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा**
**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ**

**विषय : अवयवदान जनजागृती ऑनलाईन प्रशिक्षण उपक्रमाबाबत**

**महोदय/महोदया,**

दर दोन मिनिटाला प्रत्यारोपणासाठी अवयव न मिळाल्याने, मृत्यूशैयेवरील एका रुग्णाचे, अवयव प्रतिक्षायादीवरच निधन होते. रस्त्यावरील अपघातात दरवर्षी निधन पावणाऱ्या दिड लाख व्यक्तींचे जर अवयवदान जागृतीने अवयव दात्यांत रूपांतर करता आले, तर प्रत्येक रुग्णाला जीवनदायी अवयव मिळेल. म्हणूनच सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजना व व्हीफॉर ऑर्गन्स फाऊंडेशन, पुणे (V4organs Foundation, Pune) यांच्या संयुक्त विद्यमाने रासेयो संलग्नीत महाविद्यालयातील स्वयंसेवक व अन्य विद्यार्थ्यांना अवयवदान जागृतीचे ऑनलाइन प्रशिक्षण देण्याचा उपक्रम सुरू करण्यात आलेला आहे.

प्रशिक्षण ८ प्रकरणात विभागले असून, प्रशिक्षण सामुग्री सॉफ्ट कॉपी स्वरूपात तयार आहे. विद्यार्थ्यांना आपल्या मोबाईलचा वापर करून, वैयक्तिक सोयीच्या वेळेत, सोयीच्या ठिकाणी अभ्यास करून हे प्रशिक्षण ३१ जानेवारी २०२३ पूर्वी पूर्ण करायचे आहे. प्रशिक्षण पुर्णपणे मोफत असून, ते पूर्ण झाल्यावर प्रत्येकाला ई- सर्टिफिकेट मिळेल. त्याशिवाय ज्या कॉलेजचे सर्वाधिक विद्यार्थी प्रशिक्षण पूर्ण करतील अशा १५ कॉलेजच्या रासेयो विद्यार्थी प्रमुखांना शिष्यवृत्ती देऊन त्यांच्या कार्याचा सन्मान करण्यात येईल. २६ जानेवारी रोजी अवयव दान विषयावर सर्व विद्यार्थ्यांसाठी ऑनलाईन प्रश्नमंजुषा स्पर्धा घेण्यात येईल. त्यातील प्रथम १० क्रमांकांना बँक ऑफ महाराष्ट्र यांच्या अर्थसहाय्याने शिष्यवृत्ती देण्यात येईल.

प्रशिक्षणासाठी नोंदणी आवश्यक असून त्यासाठी पुढीलप्रमाणे गुगल फॉर्मची लिंक देण्यात आलेली आहे. नोंदणी फॉर्म सोबत पहिल्या प्रकरणाच्या अभ्यास सामुग्रीची लिंक मिळेल आणि त्यानंतर क्रमशः पुढील प्रकरणांच्या लिंक मिळतील. प्रकरणावर छोटेसे व्याख्यान, माहिती पुरवणी, प्रश्नमंजुषा व छोटासा आकर्षक अवयव दानावरील व्हिडिओ असे अभ्यास सामुग्रीचे घटक असतील. त्यासाठी रासेयोची प्रस्थापित वितरण व्यवस्था वापरली जाईल. रासेयो कार्यालयातून जिल्हा व विभाग समन्वयक व त्यानंतर त्यांच्याकडून कार्यक्रम अधिकारी यांच्यामार्फत रासेयो स्वयंसेवक व इतर विद्यार्थ्यांपर्यंत, प्रशिक्षण साहित्याचे वितरण केले जाईल. महाविद्यालयाच्या स्तरावर योजना कार्यान्वित करण्यासंबंधी येणाऱ्या अडचणींसाठी मार्गदर्शक सूचना मिळणे व इतर माहितीकरिता टेलिग्राम समूह तयार केला आहे. यामध्ये सर्व रासेयो कार्यक्रम अधिकारी यांनी सहभागी व्हावे. महाविद्यालयनिहाय प्रशिक्षणासाठी किती विद्यार्थांची नोंदणी व किती विद्यार्थांचे प्रशिक्षण पूर्ण झाले याची माहिती येथे सर्वांना मिळेल.

तरी अवयवदान जनजागृती ऑनलाईन प्रशिक्षण उपक्रमामध्ये आपल्या महाविद्यालयातील अधिकाधिक स्वयंसेवक, विद्यार्थी, प्राध्यापक व शिक्षकेत्तर सेवक यांना सहभागी होण्याबाबत सूचित करावे. कळावे, ही विनंती.

**संचालक**
**राष्ट्रीय सेवा योजना**

*प्रशिक्षण नोंदणी फॉर्म लिंक:*
https://docs.google.com/forms/d/1pj7gjOhwvsg93nvoRbynSB_0y_F6eWDxz0e8B9LjgxA/edit?usp=drivesdk
*टेलिग्राम खात्याकरिता प्रवेश लिंक: कार्यक्रम अधिकारी व रासेयो विद्यार्थी प्रतिनिधी:* https://t.me/+UYIuBXX8FZU1Y2VI
***अधिक माहितीकरिता संपर्क : श्री. श्रीकांत आपटे, ९८२००७८२७३ (व्हॉट्सअप)***